MHAU120009932025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.–३१८/२०२५**
**ज्ञानेश्वर सोहनी वि. नामदेव सोहनी**

**<u>निशाणी क्र.१ खालील आदेश</u>**

**०१.** अर्जदार यांनी सदरहु अर्ज हा मुंबई नियमन १८२७ च्या विनीयम ८ नियम २ व ३ खाली दाखल केला आहे.

**०२.** अर्जदारांच्या अर्जात असे आले आहे की, मयत **शांताबाई त्रंबक सोहनी** यांचा मृत्यु दिनांक **२८.०३.२०२५** रोजी मौजे जोगेश्वरी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद येथे झाला आहे व त्या मुळच्या आमखेडा, ता. सोयगाव येथील रहिवाशी होत्या. तसेच त्यांचे पती त्रंबक सुपडू तेली (सोहनी) यांचा देखील दि.०१.०५.१९९८ रोजी मौजे सोयगाव येथे मृत्यू झालेला आहे. अर्जदार व गैरअर्जदार हे मयत शांताबाई त्रंबक सोहनी यांची मुले आहेत. तसेच अर्जदार यांनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, ते व गैरअर्जदार हे मयत **शांताबाई त्रंबक सोहनी** यांचे वारस आहेत. सबब, अर्जदार व गैरअर्जदार यांनी सदरचे प्रकरण हे मयत **शांताबाई त्रंबक सोहनी** यांचे वारस आहे, असे घोषित होवुन मिळणेबाबत दाखल केला आहे.

**०३.** गैरअर्जदारतर्फे नि.क्र.९ वर पुरसीस दाखल केली की, ते व अर्जदार हे दोन्ही मयत शांताबाई सोहनी यांचे मुले आहेत व दोघांचे नावे वारसहक्क प्रमाणपत्र देण्यास त्यांची काही एक हरकत नाही व अर्जदार यांनी केलेला अर्ज त्यांना मान्य आहे. अर्जदार **ज्ञानेश्वर त्रंबक सोहनी** यांनी त्यांच्या शपथेवर पुरावा प्रतिज्ञालेख **नि.क्र.१३** दाखल केले. तसेच अर्जदारांनी मयत **शांताबाई त्रंबक सोहनी** यांचे मृत्युप्रमाणपत्र **<u>नि.क्र.१४</u>** वर दाखल केले. त्यानंतर अर्जदार यांनी **<u>नि.क्र.–१६</u>** खाली पुरावा बंद पुरसीस दाखल केली.

**०४.** अर्जदार यांचे विधीज्ञ श्री. सुरळकर यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार हे मयत **शांताबाई त्रंबक सोहनी** यांचे वारस आहे, तसेच अर्जदारांना शासकीय योजनांचा लाभ घेणेसाठी, इतर अनुषांगिक कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्यात यावे अशी विनंती केली.

**०५.** विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अर्जाची व दाखल दस्तऐवजांची पाहणी केली. अर्ज दाखल केल्यानंतर सन १८२७ चा मुंबई विनियम ८ च्या नियम २ व ३ प्रमाणे न्यायालयाने अर्जदारांचे अर्ज मिळाल्यानंतर परिशिष्ट 'अ' मध्ये दिलेल्या नमुन्या नुसार घोषणापत्र काढले. त्यावरुन **औरंगाबाद** आवृत्तीच्या दिनांक १०.१२.२०२५ रोजीच्या **"<u>तरुण भारत</u>"** पेपर मध्ये जाहीर

नोटीस प्रकाशीत केली, ती अभिलेखात दाखल आहे. तसेच जाहीरनामा हा ग्रामपंचायत कार्यालय आमखेडा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे तसेच दिवाणी न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आला त्याचा अहवाल नि.क्र.१० नुसार अभिलेखात दाखल आहे.

**०६.** अर्जदारांच्या हक्कास आक्षेप घेणाऱ्या सर्व इसमांनी घोषणापत्राच्या तारखेपासुन एका महिन्याच्या आत न्यायालयास निवेदन करुन, आपल्या हरकती नोंदवाव्या अशी उक्त घोषणा पत्राव्दारे त्यांना विनंती करण्यात आली होती. परंतु त्यावरुन पुरेशी होईल, अशी कोणाचीही हरकत घेण्यात आली नाही. अर्जदारांनी दाखल केलेला पुरावा हा, त्यांचा उलटतपास न झाल्यामुळे अबाधित राहिला. शिवाय, गैरअर्जदार हे सदर प्रकरणात हजर होऊन त्यांनी ते व अर्जदार हे दोन्ही मयत शांताबाई सोहनी यांचे मुले आहेत व दोघांचे नावे वारसहक्क प्रमाणपत्र देण्यास त्यांची काही एक हरकत नसल्याचे कथन केले. म्हणुन अर्जदाराच्या पुराव्यानुसार ते वारस म्हणून वारस दाखला मिळण्यास पात्र आहेत. अर्जदारांनी दाखल केलेले दस्तऐवज व अर्जदारांचा अबाधित पुरावा, यावरुन असे लक्षात येते की, **शांताबाई त्रंबक सोहनी** हे **दि.२८.०३.२०२५** रोजी मयत झाल्या. तसेच अर्जदार व गैरअर्जदार हे मयत **शांताबाई त्रंबक सोहनी** यांचे वारस असल्याचे दिसुन येते. एकंदरीत सर्व बाजुचा विचार करुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदार यांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. मुंबई नियमन १८२७ च्या विनीयम ८ नियम २ व ३ प्रमाणे अर्जदार ज्ञानेश्वर त्रंबक सोहनी व गैरअर्जदार नामेदव त्रंबक सोहनी हे मयत **शांताबाई त्रंबक सोहनी** यांचे मान्यता दिलेले वारस असल्याबाबतचे परिशिष्ट 'ब' मधील नियमानुसार योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. सदरच्या प्रमाणपत्राव्दारे मयताच्या मिळकतीवर अर्जदारांचा कुठल्याही प्रकारचा अधिकार प्रस्थापित होणार नाही.

४. अर्जदारांनी विहीत न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर त्यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

५. याव्दारे प्रकरण बंद करण्यात आले.

Digitally signed by PATIL MAHENDRA BHAGWAN
Date: 2026.04.29 17:31:27 +0530

<u>दिनांक</u> – २९.०४.२०२६

[एम. बी. पाटील]
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सोयगांव